भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2015 ◐ PW 720116

20 OCT 2016 विक्री नं. ६०६६ स्टँप किंमत १००/-

सिताराम धाकटू वावडेकर

शेंबवणे ता. शाहूवाडी करारपत्र

रु. (१००/-) या स्टँप मागीतलेवरून रु. शंभर

यांचे भरती रु. ........................ असे स्टँप दिले.

कोड नंबर - २६०१०६८
अमोल रा. सुर्यवंशी
मुद्रांक विक्रेता
२३४४/४५, शॉप नं.२, सी वॉर्ड, कोल्हापूर
मुद्रांक परवाना क्र. १२/२००

TREASURY OFFICE KOLHAPUR

- 5 OCT 2016

STAMP HEAD CLERK
TREASURY OFFICE
KOLHAPUR (M.S.)

// श्री //

# खरेदीपूर्व संचकार करारपत्र

श्री.मल्हार मिनरल्स ,109/ब,सी वॉर्ड,
जैन बोर्डींग समोर,सिता कॉलनी,कोल्हापूर तर्फे
कार्यकारी भागीदार श्री.रंगराव शामराव पाटील
वय वर्षे 66, धंदा- व्यवसाय, रा.कोल्हापूर
} लिहून घेणार

श्री.सिताराम धाकटू वावडेकर
वय वर्षे 55, धंदा- शेती,
रा. मुळ गांव गेळवडे,ता. शाहूवाडी,जि.कोल्हापूर
सध्या रा. शेंबवणे पैकी बादेवाडी,ता.शाहूवाडी
.जि.कोल्हापूर 415 101.
} लिहून देणार

NOTARY
PRATAP B. JADHAV
ADVOCATE & NOTARY
KOLHAPUR DIST
REGD. No: 5493
GOVT. OF INDIA

<u>कारणे लिहून देतो खरेदीपूर्व संचकारपत्र ऐसाजे की,</u>

1) तुकडी जिल्हा कोल्हापूर पोट तुकडी तहसिल शाहूवाडी,मे.दुय्यम निबंधकसो, शाहूवाडी यांचे अधिकार क्षेत्रातील जिल्हा परिषद स्थळ सिमेतील पंचायत समिती शाहूवाडी,मौजे मौजे गेळवडे ,ता.शाहूवाडी जि.कोल्हापूर येथील भुमापन गट नंबर 7/2 याचे 7/12 उताऱ्यानुसार क्षेत्र हे. 6.86 आर व पो.खराब क्षेत्र हे.0.13 आर आकार रू.5.62 पैसे ही संपूर्ण मिळकत यातील लिहून देणार यांचे मयत वडिल कै. धाकटू झिंगू वावडेकर यांचे नांवे 7/12 पत्रकी नोंद आहे.माझे वडिल हे मयत असून त्यांना मीच एकमेव सरळ व कायेदशीर वारस आहे. सदरची शेत जमिन लिहून घेणार यांना कायम खुष खरेदी देणेचे ठरविले असून यासी चतु:सिमा:

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | - | रत्नु येसू वरेकर यांची मिळकत |
| पश्चिमेस | - | सरकारी जंगल |
| दक्षिणेस | - | मुलकीपड शेत जमिन |
| उत्तरेस | - | लघु पाटबंधारे तलाव |

येणे प्रमाणे शेत जमिनीमधील जल , तरू ,काष्ट ,पाषाण, निधी ,निक्षेप इत्यादी तदंगभूत वस्तूसह व मजला प्राप्त सर्व प्रकारचे मालकी वहिवाटीचे हक्कासह ही या करारपत्राचा विषय होय.

2) वर कलम (1) मध्ये वर्णन केलेली मिळकत ही माझे मयत वडिल कै.धाकडू झिंगू वावडेकर यांचे नांवे 7/12 पत्रकी नोंद आहे. माझे वडिल हे मयत असून त्यांना मीच एकमेव सरळ व कायदेशीर वारस आहे. अन्य कोणीही वारस नाही. त्यामुळे सदर मिळकत ही मला वारसाने प्राप्त होत असून सदर मिळकत तबदील अगर हस्तांतर करणेचा संपूर्ण हक्क व अधिकार लिहून देणार यांना प्राप्त झालेला आहे. सदर हक्क व अधिकारानुसार सदरची मिळकत ही लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना कायम खुषखरेदी विक्री करणेचे ठरवून सदर मिळकतीची आजच्या बाजार भावाप्रमाणे प्रती एकर एकूण रक्कम रूपये **67,000/- (अक्षरी रूपये सदूसष्ट हजार फक्त** ) इतकी किंमत ठरवून त्यापैकी रक्कम रूपये **5,000/-(अक्षरी रूपये पाच हजार फक्त** ) इतकी रक्कम खरेदी खर्चाकरिता कपात करणेची आहे व सदरची कपात केलेली रक्कम वगळता उर्वरित रक्कम रूपये 62,000/- (अक्षरी रूपये बासष्ट हजार फक्त ) या प्रमाणे प्रति एकरी रक्कम अदा करणेचे ठरलेले आहे. त्याप्रमाणे खरेदीची

संपूर्ण रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना रोख आदा केलली आहे. त्यामुळे सदर रक्कमेबाबत वेगळ्या भरणा पावतीचे कारण राहिलेले नाही.

3) वरीलप्रमाणे सदर मिळकतीची खरेदीची संपूर्ण रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना या करारपत्राने पूर्ण अदा केलेली आहे.

4) यातील लिहून घेणार ही नोंदणीकृत भागीदारी फर्म असून सदरची मिळकत ही लिहून घेणार या भागीदारी कंपनीने लॅटेराईट गौण खनिजाचे खाणपट्टा या प्रयोजनासाठी वनविभागास हस्तांतरीत करणेकरिता खरेदी केलेली आहे. त्याकामी आवश्यक ठिकाणी लिहून देणार यांच्या सह्या ,संमती व जाब जबाब यांची आवश्यकता भासले ती लिहून देणार यांनी विना अटी व विना मोबदला देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सदर मिळकतीचा वापर यातील लिहून घेणार हे लॅटेराईट गौण खनिजाचे खाणपट्टे मौजे घुंगुर येथील गट नंबर 685 मधील क्षेत्र हे.4.40 आर, मौजे परळी येथील गट नं.223 क्षेत्र हे.2.00 आर व मौजे आंबर्डे येथील गट नंबर 921 क्षेत्र हे.3.00 आर या खाणपट्टा क्षेत्राकरिता वन विभागाकडे वळतेकरण (हस्तांतरण ) करिता करणार आहे. याकरिता लिहून देणार यांची कांही हरकत वा तक्रार नाही.

5) लिहून देणार यांचे मालकीची वर कलम 1 मध्ये नमूद केलेले क्षेत्र वन विभाग यांचेकड लिहून घेणार हे हस्तांतर करीत असतांना लिहून देणार यांच्या आवश्यक वाटल्यास सह्या ,संमती विना तक्रार देणेच्या आहेत.

6) सदर मिळकतीवर कोणत्याही वित्तीय संस्थेचा कसलाही कर्ज बोजा नसलेबाबतचा निर्वाळा यातील लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दिलेला आहे. सदर मिळकतीचा कोणताही भाग, अशं आम्ही यापूर्वी कोणालाही दान, बक्षिस ,परोक्त, चार्ज संपादन ,भाडेपट्याने वहिवाट ,संचकार पत्र , खरेदीपत्र याद्वारे अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारे हस्तांतरित केलेला नाही. अगर त्या स्वरूपाची कोणाशी कोणत्याही व कसल्याही प्रकारचा करारसुध्दा अजिबात केलेला नाही. तसेच सदर मिळकत कोणत्याही कोर्टात वादाचा विषय नाही.

7) सदर मिळकतीचे खरेदीपत्राच्या व्यवहारामध्ये आमचे व्यतिरिक्त अन्य वारसांच्या सह्या, मान्यता ,संमतीपत्रे ,ॲफिडेव्हीट वगैरे काही एक लागलेस त्या

विनाविलंब करून देणेची संपूर्ण जबाबदारी आमचेवर राहील.तसेच सदर मिळकतीचा आज अखेरपर्यंत जो सरकारी कर अगर इतर देय रक्कमा आम्ही सदर मिळकतीचे खरेदीपत्रापूर्वी पूर्णपणे भागवणेची आहे. त्याची तोषिस लिहून घेणार यांना लागू देणेची नाही.

8) सदर मिळकतीचे खरेदीपत्राचा सर्व व्यवहार पूर्ण करणेसाठी म्हणजेच सदर मिळकतीचे संचकार पत्रापासून ते खरेदीपत्रापर्यंतचा सर्व खर्च म्हणजेच स्टॅम्प डयुटी, रजिस्ट्रेशन फी ,वकील फी, जाहिर नोटीस, टायपिंग झेरॉक्स व इतर तदअनुषंगिक लागणारा संपूर्ण खर्च हा खरेदीपत्र लिहून घेणार यांनी करणेचा आहे. सदर मिळकतीचे खरेदीपत्र हे एकमेकांचे विचाराने पूर्ण करणेचे आहे. तसेच सदर मिळकतीचे रजिस्टर खरेदीपत्र पूर्ण करणेसाठी लागणाऱ्या आवश्यक कागदपत्रावर विना मोबदला सह्या,जाब जबाब लिहून देणार यांनी करणेच्या आहेत.

9) वर कलम (1) मध्ये वर्णन केलेल्या मिळकती बाबतचे हे आमचे पहिलेच करारपत्र असून यापूर्वी आम्ही कोणासही कोणत्याही पध्दतीने लेखी अगर तोंडी लिहून दिलेली नाही.

10) वर कलम (1) मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणताही लागलिगाड हक्काबाबत निर्माण झाल्यास त्याचे निरसन आम्ही आमचे पदरखर्चाने परभारे करून देईन त्याची तोषीस तुम्हास लागू देणार नाही.

11) तसेच वर कलम (1) मध्ये वर्णन केलेल्या संपूर्ण मिळकतीचे या करारपत्रातील अव्वल पासून अखेरपर्यंतचा संपूर्ण मजकूर व अटी आम्हास मान्य व कबूल आहेत.

येणे प्रमाणे हे करारपत्र मी राजीखुषीने ,स्वसंतोषाने ,मनाच्या व शरिराच्या उत्तम अवस्थेत असताना सर्व मजकूर नीट वाचून त्याचा अर्थ व परिणाम पूर्ण लक्षात घेवून तो सर्व मजकूर व अटी मला मान्य व कबूल आहे. म्हणून लिहून दिलेला आहे. तसेच या गोष्टीचे साक्षीकरिता मी माझ्या सह्या खालील साक्षीदारांसमोर आज रोजी

कोल्हापूर मुक्कामी केले आहेत. म्हणून लिहून दिले करारपत्र ऐसाजे सही मजकूर

ता.20/10/2016. कोल्हापूर



लिहून देणार

(सिताराम धाकटू वावडेकर)



NOTARY PRATAP B. JADHAV ADVOCATE & NOTARY KOLHAPUR DIST REGD. No. 5 GOVT. OF

लिहून घेणार

BPatil

श्री.मल्हार मिनरल्स , तर्फे

भागीदार श्री.रंगराव शामराव पाटील

SHREE MALHAR MINERALS Reg.No. MPA81969 Dt.13 Sept.2011 KOLHAPUR

Shree Malhar Minerals
109, 'B' Plot No. 15, 'C' Ward,
Seeta Colony, Kolhapur.

साक्ष :

1. सही

 नांव : सुनिल गणपतराव पडवळे

 पत्ता : कोल्हापूर

2. सही

 नांव : विलास कांबळे

 पत्ता : पोर्ले ,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर.

Parties are informed to register the above document at register office on Proper Stamp

**Before Me**

21-10-2016

**PRATAP B. JADHAV**
Advocate & Notary
"Rajaram Villa" 1631, C Ward,
Shivaji Road, Kolhapur

Notary Regi. Sr. No.5159/201

20 OCT 201

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

NOTARY PRATAP B. JADHAV ADVOCATE & NOTARY KOLHAPUR DIST REGD. No. 5493 GOVT. OF INDIA

गाव नमुना सात

अधिकार अभिलेख पत्रक

( महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम, १९७१ यातील नियम ३, ५, ६ आणि ७ )

गाव :- गेळवडे तालुका :- शाहूवाडी जिल्हा :- कोल्हापुर दिनांक:- --/--/---- पर्यंत अदयावत

| गट क्रमांक व उपविभाग | भुधारणा पद्धती | भोगवटदाराचे नांव | | | |
|---|---|---|---|---|---|
| 7/2 | भोगवटादार वर्ग -I | | | | |
| शेतीचे स्थानिक नांव | | | | | |
| | | | क्षेत्र आकारआणे पै पो.ख. फे.फा | | खाते क्रमांक |
| क्षेत्र एकक हे.आर.चौ.मी | | धाकटू झिंगू बावडेकर<br>सिताराम धाकटू बावडेकर | 16.00 | ( 238 ) | 69<br>कुळाचे नाव<br>इतर अधिकार |
| जिरायत | 6.86.00 | | | | |
| बागायत | - | | | | |
| तरी | - | | | | |
| वरकस | - | | | | |
| इतर | - | | | | |
| ---------- | ---------- | | | | |
| एकुण क्षेत्र | 6.86.00 | | | | |
| ---------- | ---------- | | | | |
| पोटखराब (लागवडीस अयोग्य) | | | | | |
| वर्ग (अ) | 0.13.00 | | | | |
| वर्ग (ब) | - | | | | |
| एकुण पो ख | 0.13.00 | | | | |
| ---------- | ---------- | | | | |
| आकारणी | 5.62 | | | | |
| ---------- | ---------- | | | | |
| जुडी किवा विशेष आकारणी | - | | | | |
| | | (103),(238),(281) | | | सीमा आणि भुमापन चिन्हे |

गाव नमुना बारा
अधिकार अभिलेख पत्रक

दिनांक:- --/--/---- पर्यंत अदयावत

( महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया ( करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम,१९७१ यातील नियम २९ )

गाव: गेळवडे तालुका: शाहूवाडी जिल्हा: कोल्हापूर

| | | पिकाखालील क्षेत्राचा तपशील | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मिश्र पिकाखालील क्षेत्र | | | | | निर्भेळ पिकाखालील क्षेत्र | | | निर्भेळपिकाखालील लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | जल सिंचनाचे साधन | शेरा |
| | | मिश्रणाचा संकेत क्रमांक | | घटक पिके व प्रत्येकाखालील क्षेत्र | | | | | | | | | |
| वर्ष | हंगाम | जल सिंचित | अजल सिंचित | पिकांचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | पिकांचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | स्वरूप | क्षेत्र | | |
| 2002-03 | खरीप | | | | | | | | | पड | 6.8600 | | |
| 2003-04 | खरीप | | | | | | | | | पड | 6.8600 | | |
| 2004-05 | खरीप | | | | | | | | | पड | 6.8600 | | |
| 2005-06 | खरीप | | | | | | | | | पड | 6.8600 | | |
| 2006-07 | खरीप | | | | | | | | | पड | 6.8600 | | |
| 2007-08 | खरीप | | | | | | | | | पड | 6.8600 | | |
| 2008-09 | खरीप | | | | | | | | | पड | 6.8600 | | |
| 2009-10 | खरीप | | | | | | | | | पड | 6.8600 | | |
| 2010-11 | खरीप | | | | | | | | | पड | 6.8600 | | |
| 2011-12 | खरीप | | | | | | | | | पड | 6.8600 | | |
| 2012-13 | खरीप | | | | | | | | | पड | 6.8600 | | |
| 2013-14 | खरीप | | | | | | | | | पड | 6.8600 | | |
| 2014-15 | खरीप | | | | | | | | | पड | 6.8600 | | |

मौजे गेळवडे ता. शाहूवाडी

INDIA